Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ०४ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८६ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

जामखेड मिलिंद नगर येथे गटारींचे पाणी रस्त्यावर!



(पान २ वर)

Selected

## ट्रक मागे घेत असताना वृद्धाचा जागीच मृत्यू

पाळधी : धरणगाव एकलग्न गावात ट्रक मागे घेत असताना ट्रकचा मागे बसलेल्या वृद्धाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. येथून जवळच असलेल्या एकलग्न गावात एका कृषी केंद्रात खताच्या ट्रक क्रमांक एम एच १९ झेड २०११ हा खाली होत होता. नेमके याच ट्रकच्या मागे उत्तम मोहन पाटील (७५) हे बसलेले होते. नेमका याचाच अंदाज ट्रक चालकाला न आल्याने तो नेमका ट्रक मागे घेत असताना त्या ट्रकच्या चाकात आल्याने त्याचा खाली दाबला जाऊन त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पाळधी पोलिसांनी धाव घेऊन मदतकार्य केले. ट्रक चालक शेख अमिन शेख नबी रा. दूध फेडरेशन, जळगांव याला ताब्यात घेण्यात आले आहे.याच वेळी येथील शिवसेनेच्या शाखेची रूग्णवाहिका दाखल झाली व मृतदेह उत्तरीय तपासणी साठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला. उत्तरीय तपासणी करून मृतदेह नातेवाईकांचा ताब्यात देण्यात आला.

### शिवसेना, जेडीयूसह मित्रपक्षांनाही केंद्रीय मंत्रिपदाची संधी? अनुराग ठाकूर यांच्या पुनरागमनाची शक्यता

# केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचालींना वेग!

## अर्थमंत्रीपदासाठी पीयूष गोयल यांचे नाव आघाडीवर > निर्मला सीतारामन यांच्याकडे शिक्षण खाते

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

केंद्रातील मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात लवकरच मोठा फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, दिल्लीतील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि पक्षाचे संघटन महामंत्री बी.एल. संतोष यांच्यात २ जुलै रोजी झालेल्या सुमारे तीन तासांच्या बैठकीनंतर या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. आगामी विधानसभा निवडणुका, संघटनात्मक बदल आणि सरकारची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने या बैठकीत महत्त्वपूर्ण रणनीतीवर चर्चा



झाल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी देतानाच काही वरिष्ठ मंत्र्यांच्या खात्यांमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. संघटनेतील अनुभवी नेत्यांना केंद्र सरकारमध्ये स्थान देण्याबरोबरच काही विद्यमान मंत्र्यांना संघटनात्मक जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात.

या संभाव्य फेरबदलात सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल. चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या गोयल यांना अर्थव्यवस्थेचा सखोल अनुभव असल्याने देशाच्या अर्थमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली जाऊ शकते, अशी चर्चा जोर धरत आहे. गोयल हे महाराष्ट्रातील उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असल्याने अर्थखाते महाराष्ट्राच्या वाट्याला येण्याचीही चर्चा रंगली आहे.

सध्याच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी दिली जाऊ शकते, अशीही शक्यता व्यक्त होत आहे. विद्यमान शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या खात्यात बदल होण्याची चर्चा आहे. तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते अनुराग सिंह ठाकूर यांचे पुन्हा केंद्रीय मंत्रिमंडळात पुनरागमन होऊ शकते. युवा मतदारांमध्ये असलेला त्यांचा प्रभाव लक्षात घेता त्यांना महत्त्वाचे कॅबिनेट खाते मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे नावही मंत्रिपदासाठी चर्चेत असल्याची माहिती समोर येत आहे. पंजाबमधील भाजप नेते तरुण चुग यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते. राज्यसभेचा कार्यकाळ संपत असलेल्या काही वरिष्ठ मंत्र्यांच्या जागी नव्या आणि युवा नेतृत्वाला संधी देण्याचा विचार भाजप नेतृत्व करत असल्याचे बोलले जात आहे. काही ज्येष्ठ मंत्र्यांची राज्यपालपदी नियुक्ती होण्याच्याही चर्चा सुरू आहेत. दरम्यान, राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)**तील मित्रपक्षांनाही या फेरबदलात प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्तीयांना केंद्रात मंत्रिपद मिळू शकते, अशी चर्चा आहे. तसेच जनता दल (युनायटेड) प्रमुख नीतीश कुमार यांनी केंद्रात आपल्या पक्षाचे प्रतिनिधित्व वाढविण्याची मागणी केल्यामुळे जेडीयूलाही अधिक मंत्रिपदे मिळू शकतात.

### भाजपकडून कोणतीही अधिकृत घोषणा नाही

या सर्व घडामोडींवर अद्याप केंद्र सरकार किंवा भाजपकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार आणि संभाव्य फेरबदलाबाबत सुरू असलेल्या चर्चा सध्या राजकीय सूत्रांवर आधारित आहेत. तरीही आगामी काळात होणाऱ्या निर्णयांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले असून, मोदी सरकारच्या पुढील राजकीय रणनीतीचे चित्र या फेरबदलातून स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## धरणगाव–त्र्यंबकेश्वर थेट एसटी बससेवेचा शुभारंभ

### प्रवासी मंडळाच्या पाठपुराव्याला यश



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव ते त्र्यंबकेश्वर या बहुप्रतीक्षित थेट एसटी बससेवेचा शुक्रवार (दि. ३) रोजी धरणगाव बसस्थानकावर उत्साहात शुभारंभ करण्यात आला. धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू झाल्याने परिसरातील प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

धरणगाव–अमळनेर–धुळे–मालेगाव–नाशिक मार्गे त्र्यंबकेश्वरपर्यंत धावणाऱ्या या बसचे दुपारी २.४५ वाजता धरणगाव बसस्थानकातून प्रस्थान झाले. शुभारंभप्रसंगी बसचे चालक भूषण मराठे, वाहक व्ही. जी. चौधरी तसेच वाहतूक नियंत्रक जितेंद्र सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते ॲड. संजय महाजन यांनी या बससेवेमुळे नाशिक येथे शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच त्र्यंबकेश्वर दर्शनासाठी जाणाऱ्या प्रवाशांचा वेळ, पैसा आणि प्रवासातील गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे सांगितले. धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू झाल्याने परिसरातील प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी यांनी ही बससेवा परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, प्रवाशांच्या दीर्घकालीन मागणीला अखेर यश मिळाल्याचे नमूद केले. शुभारंभ कार्यक्रमास प्रवासी मंडळाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## दलाई लामा यांच्या ९०व्या जन्मवर्षानिमित्त चैत्यभूमीवर तिबेटी संस्कृतीची झलक!

### भारत-तिब्बत मैत्री संघ, नोरगेलिंग तिबेटियन सेटलमेंट कॅम्प आणि बुद्धिस्ट मिशनचा संयुक्त उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महामहीम दलाई लामा यांच्या ९०व्या जन्मवर्षानिमित्त भारत-तिब्बत मैत्री, शांतता, करुणा आणि बौद्ध संस्कृतीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भारत-तिब्बत मैत्री संघ (महाराष्ट्र राज्य), नोरगेलिंग तिबेटियन सेटलमेंट कॅम्प (महाराष्ट्र) आणि बुद्धिस्ट मिशन यांच्या संयुक्त



विद्यमाने भव्य चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे चित्रप्रदर्शन दि. २ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुंबईतील दादर येथील चैत्यभूमी परिसरात आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनामध्ये महामहीम दलाई लामा यांचे जीवनकार्य, तिबेटी संस्कृती, बौद्ध तत्त्वज्ञान, अहिंसा, मानवता आणि जागतिक शांततेचा संदेश देणारी विविध दुर्मीळ छायाचित्रे व चित्रे प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून तिबेटी समाजाचा सांस्कृतिक वारसा, भारत-तिब्बत मैत्रीचे दृढ संबंध तसेच भगवान बुद्धांच्या करुणा, मैत्री आणि शांततेच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आयोजकांनी नागरिक, विद्यार्थी, बौद्ध अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते तसेच कला आणि संस्कृतीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या चित्रप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

महामहीम दलाई लामा यांच्या ९०व्या जन्मवर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा सांस्कृतिक उपक्रम शांतता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारा ठरणार असून, मुंबईकरांसाठी तिबेटी संस्कृती आणि बौद्ध विचार जाणून घेण्याची ही एक महत्त्वाची संधी ठरणार आहे.

## धुळ्यात रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी व्यापारी महासंघ व एबी फाउंडेशनचा पुढाकार!

जन सम्राट टाईम्स

**धुळे, प्रतिनिधी :** धुळे शहर व जिल्ह्यात निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी धुळे व्यापारी महासंघ आणि एबी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहरातील दोन ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. धुळे जिल्ह्यातील विविध रक्तपेढ्या आणि शासकीय



रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यात अडचणी येत आहेत. ही गरज लक्षात घेऊन व्यापारी महासंघ आणि एबी फाउंडेशनने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. शहरातील दोन ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदानाबरोबरच नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासण्यांचाही लाभ उपलब्ध करून देण्यात आला. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी एबी फाउंडेशनचे कमलेश देवरे, किशोर डीयालानी, दीपक लुल्ला यांच्यासह व्यापारी महासंघाचे पदाधिकारी, व्यापारी बांधव आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांनी अधिकाधिक नागरिकांनी नियमित रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

## पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीवर मुकुंद गोसावी यांची नियुक्ती!

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अर्थात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीवर सामाजिक कार्यकर्ते तथा मुक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष मुकुंद गोसावी यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्नील सांगळे यांनी यासंदर्भातील नियुक्ती आदेश जारी केला. या समितीच्या माध्यमातून जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी जनजागृती, मुलींच्या जन्मदरात वाढ करण्यासाठी सामाजिक प्रबोधन तसेच आवश्यकतेनुसार सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीस सहकार्य करण्याची जबाबदारी समितीच्या सदस्यांवर राहणार आहे. तसेच समितीच्या नियमित बैठकींना उपस्थित राहून कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्याची भूमिकाही सदस्यांकडून पार पाडली जाणार आहे.मुकुंद गोसावी यांच्या नियुक्तीचे विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांनी स्वागत करत, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध आणि 'बेटी बचाओ' जनजागृती मोहिमेला त्यांच्या अनुभवाचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.न

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# अकोल्याचा मुद्रांक जिल्हाधिकारी चौधरीच्या जळगावच्या घरातून 2.94 कोटींचे घबाड जप्त

## एसीबीच्या धाडीत रोख, सोन्याची बिस्किटे आणि मालमत्तेची कागदपत्रे जप्त

जन सम्राट टाईम्स

**अकोला | प्रतिनिधी :** लाचखोरीच्या प्रकरणात अटक झालेले अकोल्याचे सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (वर्ग-१) किरण पुरुषोत्तम चौधरी यांच्या जळगाव येथील निवासस्थानी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) टाकलेल्या धाडीत तब्बल २ कोटी ९४ लाख ६४ हजार ८४७ रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागासह प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिक आणि जळगाव एसीबीच्या संयुक्त पथकाने जवळपास २४ तास चाललेल्या 'इन-कॅमेरा' झाडाझडतीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम, सोन्याची बिस्किटे, दागिने,





मालमत्तेची कागदपत्रे आणि महागड्या घरगुती वस्तू हस्तगत केल्या. संपूर्ण कारवाईचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले.

### छाप्यात काय जप्त झाले?

एसीबीच्या तपासात घरातून १ कोटी ५३ लाख ८४ हजार ६३० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम ५००, २००, १००, ५० आणि २० रुपयांच्या नोटांच्या पुडक्यांमध्ये ठेवलेली होती.

याशिवाय ४२२ ग्रॅम वजनाचे ६० लाख ५७ हजार १३५ रुपयांचे सोने, ज्यामध्ये १६० ग्रॅम वजनाची दोन सोन्याची बिस्किटे आणि इतर दागिन्यांचा समावेश आहे, तेही हस्तगत करण्यात आले. तसेच ११ लाख ५२ हजार ७४५ रुपयांच्या सोने खरेदीच्या पावत्या, १५४ ग्रॅम चांदी, अंदाजे ६२ लाख १३ हजार ३७६ रुपयांच्या मालमत्तेची कागदपत्रे आणि ६ लाख २५ हजार ५४५ रुपयांचे महागडे घरगुती साहित्यही जप्त करण्यात आले.

### पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न फसला

या प्रकरणात २५ जून रोजी एसीबीचे पथक चौधरी यांच्या घरी पोहोचले असता घर बंद असल्याने ते सील करण्यात आले होते. मात्र, २७ जून रोजी चौधरी यांच्या चुलत्याने सील तोडून घरात प्रवेश करत पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असून, पोलिसांनी त्यांना रंगेहात अटक केली होती. या घटनेनंतर तपास यंत्रणांनी अधिक सतर्कता बाळगत पुढील कारवाईला वेग दिला.

### पत्नी आणि पंचांच्या उपस्थितीत झाडाझडती

२ जुलै रोजी चौधरी यांच्या पत्नी मनीषा चौधरी, नातेवाईक, दोन शासकीय पंच, बँकेचे कॅशियर आणि अधिकृत सोनार यांच्या उपस्थितीत घराचे सील उघडण्यात आले. त्यानंतर सखोल झाडाझडती घेण्यात आली आणि कोट्यवधींची मालमत्ता समोर आली.

### एसीबीच्या छाप्यात काय-काय सापडले?

**रोख रक्कम:** १ कोटी ५३ लाख ८४ हजार ६३० रुपये (५००, २००, १००, ५० आणि २० रुपयांच्या नोटांची पुडकी).

**सोन्याचे दागिने:** ६० लाख ५७ हजार १३५ रुपये किमतीचे ४२२ ग्रॅम सोने (यात १६० ग्रॅम वजनाची सोन्याची दोन बिस्किटे आणि इतर दागिन्यांचा समावेश आहे).

**खरेदी पावत्या:** ११ लाख ५२ हजार ७४५ रुपयांच्या सोने खरेदीच्या पावत्या.

**चांदी:** ३१ हजार ४१६ रुपये किमतीची १५४ ग्रॅम चांदी.

प्रॉपर्टीचे कागदपत्रे: ६२ लाख १३ हजार ३७६ रुपये किमतीच्या वेगवेगळ्या मालमत्तांचे खरेदीखत आणि बक्षीसपत्रांचे दस्तऐवज (हे स्वतःच्या आणि कुटुंबाच्या नावावर आहेत).

### तपासाचा विस्तार होण्याची शक्यता

किरण चौधरी यांच्याविरुद्ध अकोल्यातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात यापूर्वीच लाचखोरीचा गुन्हा दाखल असून, आता जप्त करण्यात आलेल्या रोख रक्कम, सोने आणि मालमत्तेच्या स्रोताचा तपास एसीबीकडून सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची चौकशी होण्याची शक्यता असून, तपासाचा विस्तार होण्याची चिन्हे आहेत.

## नाशिकची साक्षी जैन देशात अव्वल; सीए फाउंडेशन परीक्षेत 92.75 टक्क्यांसह प्रथम क्रमांक

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी :** 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' (ICAI) तर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फाउंडेशन परीक्षेच्या निकालात नाशिकने देशपातळीवर इतिहास रचला आहे. नाशिकमध्ये शिक्षण घेणारी आणि मूळची जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील रहिवासी असलेली साक्षी जैन हिने ४०० पैकी तब्बल ३७१ गुण (९२.७५ टक्के) मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे नाशिकसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

सीएसारख्या देशातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठेच्या परीक्षेच्या पहिल्याच टप्प्यात साक्षीने मिळवलेले यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. विशेष म्हणजे, नाशिकच्या शैक्षणिक इतिहासात प्रथमच सीए फाउंडेशन परीक्षेत शहरातील विद्यार्थिनीने देशात अव्वल येण्याचा मान मिळवला आहे.

यंदा नाशिक शहरातून ९८७ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ३२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शहरातील गुणवंतांमध्ये उत्कर्ष कैलास वाणी याने ३४३ गुणांसह दुसरा, तर अनन्या अतुल माहेश्वरी हिने ३४० गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना साक्षी जैन म्हणाली, "देशात प्रथम क्रमांक मिळाल्याचा खूप आनंद होत आहे. मी मूळची जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील असून अकरावीपासून नाशिकमधील जैन बोर्डिंगमध्ये राहून शिक्षण घेत आहे. सीए होण्याचे ध्येय समोर ठेवून मी दररोज ११ ते १२ तास अभ्यास केला. माझ्या यशाचे श्रेय आई-वडील, भाऊ आणि शिक्षकांना जाते. माझा भाऊही सीए असल्यामुळे त्याचे मार्गदर्शन मला लाभले. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनत घेतली तर कोणतेही ध्येय अशक्य नसते," असे तिने सांगितले. साक्षीच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, नाशिककरांसाठी ही अभिमानाची बाब असल्याची प्रतिक्रिया शैक्षणिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# संत सखाराम महाराज संस्थानाच्या पुनर्बांधणीसाठी शासनाची सर्वतोपरी मदत

## ‘ब’ वर्ग दर्जासाठी पाठपुरावा : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स



**अमळनेर :** अमळनेरचे ग्रामदैवत आणि लाखो भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या संत सखाराम महाराज संस्थानात लागलेल्या भीषण आगीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शुक्रवारी संस्थानाला भेट दिली. मंदिर परिसराची पाहणी करून त्यांनी नुकसानीचा आढावा घेतला तसेच संस्थानचे विश्वस्त आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, संत सखाराम महाराज हे अमळनेरचे ग्रामदैवत असून या पवित्र स्थळी घडलेली आग अत्यंत दुर्दैवी आहे. शासन या संकटाच्या काळात संस्थानच्या पाठीशी ठामपणे उभे राहील. नुकसानीचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. मंदिरात दर्शन घेतल्यानंतर त्यांनी संत सखाराम महाराज संस्थानाला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी शासनाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करून मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशाचे जतन व संवर्धन करणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सुमारे अडीचशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या संस्थानातील आगीत सुमारे ४०० वर्षे जुना सागवान लाकडाचा ऐतिहासिक सभामंडप पूर्णपणे जळून खाक झाला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या प्रकरणाची नोंद अमळनेर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. यावेळी संस्थानचे अध्यक्ष तथा प्रमुख विश्वस्त प.पू. प्रसाद महाराज (गुरु ज्ञानेश्वर महाराज), विश्वस्त रविकांत देशमुख, जयंत मोडक, एकनाथ सातपूरकर, प्रसाद नाईक, सल्लागार राजेंद्र भामरे, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगरसेवक तसेच विविध विभागांचे अधिकारी, सेवेकरी, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि भाविक उपस्थित होते.

### प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा

मंदिर परिसराची पाहणी करून त्यांनी नुकसानीचा आढावा घेतला तसेच संस्थानचे विश्वस्त आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, संत सखाराम महाराज हे अमळनेरचे ग्रामदैवत असून या पवित्र स्थळी घडलेली आग अत्यंत दुर्दैवी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# पदविकाधारक पशुवैद्यकांच्या न्याय्य मागण्यांना यश!

## पशुसंवर्धन आयुक्तांची सकारात्मक पावले

जन सम्राट टाईम्स




**पुणे । प्रतिनिधी :** पुणे येथील बैठकीत पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवस्थापन सेवा संघाच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेतले आहेत:

* सेवा प्रवेश नियमांत दुरुस्ती: पशुधन पर्यवेक्षक भरती नियमावलीतील त्रुटी दूर करून, २००७ पूर्वीच्या पदविकाधारकांना पात्र ठरवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाला तातडीने निर्देश दिले.

* कृत्रिम रेतन तंत्रज्ञान: कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना 'गर्भधारणा तपासणी'चा अधिकार देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, सुधारित पात्रतेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

* स्वतंत्र परिषद: महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यक परिषद स्थापन करण्याच्या मागणीवर चर्चा झाली. तसेच 'पॅरा व्हेट' या संज्ञेला संघटनेने कडाडून विरोध दर्शविला.

* पशुसखी/पशुमित्र संकल्पना: या संकल्पनांबाबत संघटनेच्या असंतोषाची दखल घेत केंद्र सरकारला पत्र पाठवण्याचे आयुक्तांनी मान्य केले.

* प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम: नवीन डिप्लोमा अभ्यासक्रम आणि अनुदान योजनांमधील अटी शिथिल करण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

* पुढील दिशा: प्रलंबित मागण्यांसाठी संघर्ष सुरूच राहणार असून, राज्यातील सर्व आमदारांना पुन्हा निवेदन देण्याचे आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

बैठकीला उपस्थित पदाधिकारी: डॉ. सु. वा. कुलकर्णी (अध्यक्ष), डॉ. सागर आरुटे (कार्याध्यक्ष), डॉ. अप्पासो पाटील (उपाध्यक्ष), डॉ. मल्हारी लवांडे (उपकार्याध्यक्ष), डॉ. वैभव पाटील (सचिव), डॉ. संदिप मंडलिक (कोशाध्यक्ष), डॉ. मुकेश चावरे (सहसचिव), तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. दिपक आहेर-पाटील व डॉ. संतोष तेरसे हे उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# मुस्लिम समाज अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी मुलतानी

## विकासासाठी प्रभावी कार्याची अपेक्षा

जन सम्राट टाईम्स




**धुळे । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने मुस्लिम समाजाच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करून विकासात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष ईद्रीस मुलतानी यांची नियुक्ती केली आहे. २९ जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार त्यांना राज्यमंत्री दर्जाही बहाल करण्यात आला आहे. या नियुक्तीचे राज्यभरातून, विशेषतः खान्देशातून स्वागत करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अल्पसंख्याक विभागाचे धुळे जिल्हाध्यक्ष नाजीम शेख यांनी मुंबई मंत्रालयात ईद्रीस मुलतानी यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. नाजीम शेख यांनी या नियुक्तीचे स्वागत करताना सांगितले की, ईद्रीस मुलतानी यांच्या नेतृत्वामुळे मुस्लिम समाजाच्या शिक्षण, रोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक विकासाशी संबंधित प्रश्नांना शासन स्तरावर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या मते, या समितीच्या माध्यमातून उपेक्षित घटकांना सक्षम प्रतिनिधित्व मिळेल, शैक्षणिक गळती रोखण्यासाठी उपाययोजना सुचविल्या जातील, स्वयंरोजगार व कर्जसुविधा वाढविण्यावर भर दिला जाईल, तसेच मुस्लिमबहुल भागांतील पायाभूत सुविधांच्या विकासालाही गती मिळेल. याशिवाय विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी समिती अभ्यास करून आवश्यक शिफारसी करेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. नाजीम शेख म्हणाले, "ईद्रीस मुलतानी यांनी सातत्याने अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांसाठी कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे मुस्लिम समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळण्यास निश्चितच मदत होईल."

### स्वयंरोजगार वाढविण्यावर भर

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे धुळे जिल्हाध्यक्ष नाजीम शेख यांनी मुंबई मंत्रालयात ईद्रीस मुलतानी यांची भेट घेत पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. नाजीम शेख यांनी या नियुक्तीचे स्वागत करताना सांगितले की, ईद्रीस मुलतानी यांच्या नेतृत्वामुळे मुस्लिम समाजाच्या शिक्षण, रोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक विकासाशी संबंधित प्रश्नांना शासन स्तरावर अधिक प्रभावीपणे मांडता येईल.

# उल्हासनगर मुक्तिबोध स्मशानभूमिची दुरावस्था!

जन सम्राट टाईम्स



**ठाणे । प्रतिनिधी :** प्रशांत ल. ढोणे उल्हासनगर महानगर पालिका कॅम्प न.४ येथील मुक्तिबोध स्मशानभूमिची अवस्था खराब झाली असून त्याठिकाणी मयत घेऊन जाव की नाही अशी अवस्था झाली असून त्याची विल्हेवाट लावण्यात कमालीची अडचण निर्माण होत आहे कारण त्या ठिकाणी मयत जाळंण्यासाठी असलेल्या पत्र्याचे शेड पूर्णपणे मोडकळीस आले असून त्याकडे महापालिका प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन तेथे त्याची दुरुस्ती करावी अशी नागरिकांची मागणी होत असल्याचे दिसून आले मयत जळत असताना वरुण पावसाच्या धारा पडतात त्यामुळे मयताची विल्हेवाट लावणाऱ्या कर्मचारी यांना पावसाच्या वेळी मोठ्या संकटाला तोंड देण्याची वेळ आली आहे तरी याची जाणीव महानगर पालिका आयुक्त,महापौर आणि इतर पदाधिकारी यांना देण्यात येणार असून त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करावी यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचे शिवसेना वरिष्ट कार्यकर्ते आणि त्या विभागातील जागरूक राजेश माने साहेब यांनी मिडियाशी बोलताना सांगितले

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये पापाशेठ वाघरे मित्रपरिवाराकडून शैक्षणिक साहित्य व कपडे वाटप

## गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव (प्रतिनिधी):** धरणगाव शहरातील सुवर्णमहोत्सवी महात्मा फुले हायस्कूल येथे पापाशेठ वाघरे मित्रपरिवाराच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि कपड्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांची शैक्षणिक वाटचाल अधिक सक्षम व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी पापाशेठ वाघरे, पत्रकार अविनाश बाविस्कर, सुरज वाघरे, रवी करोसिया, संजय सोनवणे, माजी हॉलीबॉलपटू चेतन वाघरे, माजी कुस्तीपटू नरेंद्र बिवाल, प्रल्हाद पचेरवार, संजय पचेरवार आणि सुजीत वाघरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात १० शालेय ड्रेस, १० डझन वह्या, २० चित्रकला वह्या, २० रंगपेट्या, २० कंपास पेट्या तसेच २० पेन यांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी सुरज वाघरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, "विद्यार्थ्यांनी मन लावून शिक्षण घ्यावे. आम्ही केलेली ही छोटीशी मदत तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी आहे. तुम्ही शिकून मोठे व्हा आणि शाळेसह कुटुंबाचे नाव उज्ज्वल करा. बहुजन समाजाला शिक्षणाशिवाय दुसरा तरणोपाय नाही," असा प्रेरणादायी संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी शाळेत राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, पुस्तक पेढी,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी पापाशेठ वाघरे मित्रपरिवाराच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले.

# साक्रीत प्रेमीयुगुलाची विष प्राशन करून आत्महत्या

## ‘आम्ही जगण्याला कंटाळलोय, माफ करा’ म्हणत तरुणाचा वडिलांना अखेरचा व्हिडिओ कॉल

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी । धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील कढरे गावात मजुरीसाठी आलेल्या एका प्रेमीयुगुलाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. आत्महत्येपूर्वी तरुणाने आपल्या वडिलांना व्हिडिओ कॉल करून "आम्ही जगण्याला कंटाळलोय... आम्हाला माफ करा," असे सांगत विषाची रिकामी बाटलीही दाखवल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांची ओळख किरण सुभाष वाघ (वय २३) आणि वैशाली भिमसिंग पवार (वय १९) अशी असून, दोघेही नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील आमोदे गावचे रहिवासी होते. या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कढरे शिवारातील एका शेतात गुरुवारी सायंकाळी दोघेही बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. शेतमालक आणि स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने जैताणे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच दोघांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती मिळताच निजामपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. घटनास्थळावरून विषाची बाटली आणि इतर पुरावे जप्त करण्यात आले. आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

### प्रेमसंबंधामुळे घर सोडले होते


प्राथमिक माहितीनुसार, किरण वाघ हा विवाहित होता आणि त्याला तीन वर्षांचा मुलगाही आहे. तरीही किरण आणि वैशाली यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले होते. कुटुंबीयांच्या विरोधामुळे दोघांनी गेल्या महिन्यात घर सोडले होते. त्यानंतर शहादा पोलीस ठाण्यात दोघे बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. घर सोडल्यानंतर दोघे साक्री तालुक्यातील कढरे परिसरात येऊन मजूर म्हणून काम करत होते. एकत्र आयुष्य जगण्याचा निर्णय घेतलेल्या या प्रेमीयुगुलाने अखेर टोकाचे पाऊल उचलल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

### आत्महत्येपूर्वी वडिलांना अखेरचा व्हिडिओ कॉल

आत्महत्येपूर्वी किरणने आपल्या वडिलांना व्हिडिओ कॉल केला. त्यावेळी त्याने "आम्ही जगण्याला कंटाळलोय, आम्हाला माफ करा," असे सांगत विषाची रिकामी बाटली दाखवली. त्यानंतर संपर्क तुटला. काही वेळातच दोघेही गंभीर अवस्थेत आढळून आले. पोलिसांकडून या व्हिडिओ कॉलसह सर्व तांत्रिक बाबींची पडताळणी केली जात असून, आत्महत्येमागील वैयक्तिक, कौटुंबिक किंवा इतर कारणांचा तपास केला जात आहे.

# जामखेड मिलिंद नगर येथे गटारींचे पाणी रस्त्यावर!

## परिसरातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात



जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी:** शहरातील मिलिंद नगर परिसरातील गटारींचे पाणी तसेच सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मिलिंद नगर प्रभाग क्रमांक सहा परिसरातील गटारीचे तसेच सांडपाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरपरिषद व नगरसेवकांचे या बाबींकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. तातडीने उपाय योजना करावी नगराध्यक्ष व नगरपरिषद प्रशासनाला सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी निवेदनातून तीव्र आंदोलनाचा ईशाला देण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, मिलिंद नगर मधील कांबळे किराणा ते संजय वाघमारे या दरम्यान अंडरग्राऊंडर गटार / नालीमध्ये सांडपाणी तुंबले आहे त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे तसेच डासांची वाढ होत आहे.

त्यामुळे नागरिकांमध्ये थंडी ताप मलेरिया, डेंगू सारखे रोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

मिलिंद नगर परिसरात छोटे लहान बालक मुलांची संख्या जास्त असून सदर लहान मुले रस्त्यावर खेळत असतात या परिसरात दुर्गंधी तसेच सांडपाण्याची दुरावस्था झाली असून पाणी हे रस्त्यावर येत आहे.

मिलिंद नगर परिसरात नगरपरिषदचे दुर्लक्ष असून सफाई कामगार व गटार साफ होत नाही. निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते संदेश घायतडक, कांताबाई अंकुश गायकवाड, दीपाली अनिल वाघमारे, संजय राजाराम भोसले, संतोष लक्ष्मण डाडर, उमेश गायकवाड, संजय वाघमारे, पूनम अशोक कांबळे, राधा जाधव, मयूर जाधव, नितीन राऊत, सरस्वती गायकवाड, अक्षय गायकवाड, राजेंद्र गायकवाड, कृष्णा साळवे आदी नागरिकांच्या सह्या आहेत

> नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ पाहणी करून पावसाचे दिवस असल्याने गटारीचे पाणी व सांडपाण्याची विल्हेवाट लावावी अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.
> **- संदेश घायतडक.** सामाजिक कार्यकर्ते

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# रायगडवर 'भक्ती शक्ती शिवकालीन युद्धकला आखाडा' पथकाचा थरार

## ३५३ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात जळगावचा गौरव!; शौर्याचा गौरवशाली वारसा

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद (जळगाव) । प्रतिनिधी:** हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या ऐतिहासिक रायगड किल्ल्यावर ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी निमित्त आयोजित ३५३ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पूर्वसंध्येला, 'भक्ती शक्ती शिवकालीन युद्धकला आखाडा पथक, अण्णा नगर'ने आपल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी रायगडवर शिवशाहीचा हुंकार भरला. या सोहळ्यात ३५३ व्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ३५३ दांडपट्ट्यांचे सामूहिक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यात जळगाव जिल्ह्यातील 'भक्ती शक्ती शिवकालीन युद्धकला आखाडा पथका'ने उत्स्फूर्त सहभाग घेत शिवकालीन युद्धकलेचा गौरव वाढविला. पथकातील विद्यार्थी आणि प्रशिक्षकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दांडपट्टा, तलवार, लाठी-काठी व इतर शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर केली. उपस्थितांनी या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

*सहभागी वीर मावळे* या दिमाखदार प्रदर्शनात



आशिष खैरे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली खालील मावळ्यांनी सहभाग घेतला:

* *पुरुष:* विनायक मोतीलाल भोई, समर्थ संजय गायकवाड, चेतन छोडू भोई, पवन मोतीलाल भोई, हर्षल धनराज भोई, भूषण भागवत धनगर आणि शुभम मोहन रूमकर.

* *स्त्री शक्ती:* जान्हवी भालचंद्र रोटे, टिंकल धनराज राजपूत, टिना तुषार धांडे आणि मानसी वसंत भारंबे.

*सन्मानाचा क्षण* ऐतिहासिक रायगडच्या पवित्र भूमीवर आपली संस्कृती आणि युद्धकला जिवंत ठेवणाऱ्या या तरुण कलावंतांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या विशेष कार्याबद्दल पथकाचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला, ज्याची झलक फोटो मध्ये पाहायला मिळते. या सोहळ्यातील आठवणी फोटो मध्ये कैद झाल्या आहेत.

*भविष्यातील संकल्प* "देव, देश आणि धर्म" या ध्येयाने प्रेरित होऊन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतींना अभिवादन करत, भविष्यातही शिवकालीन युद्धकलेचे संवर्धन करणे, युवकांमध्ये स्वसंरक्षणाची भावना जागृत करणे आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजविण्याचे कार्य अखंडपणे सुरू ठेवण्याचा संकल्प पथकाने व्यक्त केला आहे.

**युद्धकलेची प्रात्यक्षिके :** या सोहळ्यात ३५३ व्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ३५३ दांडपट्ट्यांचे सामूहिक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्यात जळगाव जिल्ह्यातील 'भक्ती शक्ती शिवकालीन युद्धकला आखाडा पथका'ने उत्स्फूर्त सहभाग घेत शिवकालीन युद्धकलेचा गौरव वाढविला. पथकातील विद्यार्थी आणि प्रशिक्षकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दांडपट्टा, तलवार, लाठी-काठी व इतर शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर केली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306